**जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव**

**DAY-NULM विभाग**

**अभिस्वारस्य प्रस्ताव सूचना**

---

**विषय** : SMILE (Support for Marginalized Individuals for Livelihood and Enterprise)

योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संस्था नियुक्त करणे बाबत

जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव यांचेमार्फत सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार यांच्या SMILE (Support for Marginalized Individuals for Livelihood and Enterprise) योजनेंतर्गत "Comprehensive Rehabilitation of Persons Engaged in the Act of Begging" या उपघटकाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पात्र व अनुभवी स्वयंसेवी संस्था / एनजीओ / कार्यान्वयन संस्था यांच्याकडून सीलबंद अभिस्वारस्य प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

**१. योजनेचे नाव**

SMILE (Support for Marginalized Individuals for Livelihood and Enterprise)

**२. योजनेचा उद्देश**

भिक्षावृत्ती करणाऱ्या व्यक्तींचे सर्वेक्षण, ओळख, समुपदेशन, पुनर्वसन, कौशल्य विकास, निवारा सुविधा, आरोग्य सुविधा व उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून देऊन "भिक्षामुक्त भारत" या उद्दिष्टाची पूर्तता करणे.

**३. कामाचे स्वरूप व सविस्तर जबाबदाऱ्या**

नियुक्त कार्यान्वयन संस्थेस SMILE योजनेंतर्गत खालील सर्व कामे शासन मार्गदर्शक सूचना, महानगरपालिकेचे निर्देश व प्रचलित नियमांनुसार करणे बंधनकारक राहील :

**अ) संस्थेमार्फत सर्वेक्षण करणे व लाभार्थीची ओळख पटविणे**

जळगाव शहर महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक ठिकाणे, धार्मिक स्थळे, बसस्थानक, रेल्वे स्थानक, बाजारपेठ, सिग्नल, पर्यटन स्थळे इत्यादी भागांमध्ये भिक्षावृत्ती करणाऱ्या व्यक्तींचे सखोल सर्वेक्षण करणे.

लाभार्थ्यांची वैयक्तिक माहिती, कुटुंबीय तपशील, आरोग्य स्थिती, व्यसनाधीनता, शैक्षणिक माहिती, रोजगार स्थिती व सामाजिक परिस्थितीची नोंद करणे.

सर्वेक्षणाची माहिती शासनाच्या SMILE-B पोर्टलवर नियमितपणे अपलोड करणे.

आधार कार्ड, रेशन कार्ड, मतदान ओळखपत्र इत्यादी ओळख दस्तऐवज नसलेल्या व्यक्तींची नोंद करून संबंधित विभागाशी समन्वय साधणे.

महिला, बालक, दिव्यांग, वृद्ध व व्यसनाधीन व्यक्तींची स्वतंत्र श्रेणीकरण करून विशेष पुनर्वसन आराखडा तयार करणे.

**ब) संस्थेने बचाव, समुपदेशन व जनजागृती करणे**

- भिक्षावृत्ती करणाऱ्या व्यक्तींना सन्मानपूर्वक बचाव व पुनर्वसन प्रक्रियेत सहभागी करून घेणे.
- मानसोपचार तज्ञ / समुपदेशकांच्या माध्यमातून वैयक्तिक व गट समुपदेशन करणे.
- कुटुंब पुनर्मिलनासाठी लाभार्थ्यांच्या कुटुंबीयांशी संपर्क साधणे.
- शहरामध्ये जनजागृती मोहिमा, पोस्टर, बॅनर, सोशल मीडिया, पथनाट्य, IEC उपक्रम राबविणे.
- बाल भिक्षावृत्ती आढळल्यास संबंधित बालकल्याण समिती / बाल संरक्षण विभागाशी समन्वय साधणे.

**क)संस्थेने निवारागृह व्यवस्थापन करणे**.

- किमान ५० लाभार्थी क्षमतेचे निवारागृह उपलब्ध करून देणे.
- निवारागृहामध्ये स्वतंत्र महिला व पुरुष व्यवस्था ठेवणे.
- लाभार्थ्यांना सुरक्षित व स्वच्छ निवास सुविधा उपलब्ध करून देणे.
- नियमित स्वच्छता, पिण्याचे पाणी, वीज, शौचालय, स्नानगृह व सुरक्षा व्यवस्था राखणे.
- लाभार्थ्यांना सकाळचा नाश्ता, दुपारचे जेवण, रात्रीचे जेवण व दोन वेळचा चहा उपलब्ध करून देणे.
- कपडे, स्वच्छता साहित्य, बेडशीट, ब्लँकेट इत्यादी साहित्य उपलब्ध करून देणे.
- निवारागृहात २४x७ सुरक्षा व्यवस्था राखणे.

**ड) संस्थेने आरोग्य व संरक्षण सेवा उपलब्ध करणे**.

- लाभार्थ्यांची नियमित वैद्यकीय तपासणी आयोजित करणे.
- आवश्यकतेनुसार शासकीय रुग्णालयात उपचारासाठी समन्वय साधणे.
- मानसिक आरोग्य, व्यसनमुक्ती व समुपदेशन सेवा उपलब्ध करून देणे.
- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (PM-JAY) व इतर आरोग्य योजनांचा लाभ मिळवून देणे.
- आपत्कालीन परिस्थितीत तातडीची वैद्यकीय मदत उपलब्ध करून देणे.

ई) संस्थेने लाभार्थीसाठी **शिक्षण, कौशल्य विकास व उपजीविका**

- लाभार्थ्यांच्या क्षमतेनुसार कौशल्य विकास प्रशिक्षण आयोजित करणे.
- PM-DAKSH, DAY-NULM, कौशल्य विकास योजना व इतर शासकीय योजनांशी लाभार्थ्यांना जोडणे.
- स्वयंरोजगार, लघुउद्योग, रोजगार मेळावे व रोजगार उपलब्धतेसाठी प्रयत्न करणे.
- बालकांना जवळील शाळेत प्रवेश मिळवून देण्यासाठी शिक्षण विभागाशी समन्वय साधणे.
- लाभार्थ्यांना आर्थिक सक्षमीकरणासाठी बचत गट, स्वयंरोजगार व उद्योजकता मार्गदर्शन करणे.

**फ) संस्थेने पुनर्वसन व पाठपुरावा**

- प्रत्येक लाभार्थ्याचा वैयक्तिक पुनर्वसन आराखडा तयार करणे.
- पुनर्वसनानंतर लाभार्थ्यांचा नियमित पाठपुरावा करणे.
- पुनर्वसित लाभार्थी पुन्हा भिक्षावृत्तीकडे वळणार नाहीत यासाठी समुपदेशन व मार्गदर्शन करणे.
- कुटुंब पुनर्मिलन झालेल्या लाभार्थ्यांच्या परिस्थितीचा आढावा घेणे.
- पुनर्वसन प्रक्रियेचा मासिक व त्रैमासिक अहवाल महानगरपालिकेस सादर करणे.

**ग) संस्थेमार्फत मनुष्यबळ व्यवस्था**

संस्थेकडे खालीलप्रमाणे प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध असणे आवश्यक राहील :

१. प्रकल्प व्यवस्थापक

२. समुपदेशक

३. पूल अभ्यासक्रम समन्वयक

४. आया / काळजीवाहक

५. स्वयंपाकी

६. सुरक्षा रक्षक

७. क्षेत्रीय समन्वयक / सर्वेक्षक

**घ) संस्थेने अहवाल अद्यावत ठेवणे**

महानगरपालिकेच्या निर्देशानुसार दैनंदिन, साप्ताहिक व मासिक अहवाल सादर करणे.

- शासन पोर्टलवर सर्व माहिती वेळोवेळी अद्ययावत करणे.
- सामाजिक लेखापरीक्षण व तपासणीसाठी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देणे.

- महानगरपालिका, जिल्हा प्रशासन व शासन स्तरावरील अधिकाऱ्यांना आवश्यक सहकार्य करणे.
- योजनेचे रिअल-टाईम मॉनिटरिंग सुलभ होण्यासाठी डिजिटल नोंदी ठेवणे.

### ४. संस्थेकरिता पात्रता निकष

अर्जदार संस्था / स्वयंसेवी संस्था / ट्रस्ट / सोसायटी यांनी खालील पात्रता निकष पूर्ण करणे आवश्यक राहील :

१. संस्थेकडे ५० खाटांचे सर्व सोयी-सुविधा युक्त निवारा गृह जळगाव शहरात उपलब्ध असणे आवश्यक.
२. संस्था महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम / सोसायटी नोंदणी अधिनियम / कंपनी अधिनियम अंतर्गत विधिवत नोंदणीकृत असावी.
३. संस्था www.ngodarpan.gov.in वर नोंदणीकृत असणे आवश्यक राहील व NGO-DARPAN Unique ID सादर करणे बंधनकारक राहील.
४. भिक्षावृत्ती गुंतलेल्या करिताचे निवासी आश्रम, किवा संस्थेस शासकीय अथवा स्वता:चे तत्सम अनाथ आश्रम,वृद्धाश्रम चालविण्याचा किमान ०२ वर्षा चा अनुभव असावा
५. ५० किंवा त्यापेक्षा अधिक लाभार्थी क्षमतेचे निवारागृह / बेघर निवारा किवा तत्सम केंद्र चालविल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.
६. संस्थेकडे आवश्यक प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध असणे आवश्यक राहील.
७. संस्थेकडे कार्यालयीन सुविधा, संगणकीय प्रणाली, डेटा व्यवस्थापन क्षमता व क्षेत्रीय कामकाजाचा अनुभव असावा.
८. संस्थेची मागील ३ वर्षांची सरासरी आर्थिक उलाढाल समाधानकारक असावी.
९. संस्थेविरुद्ध कोणतीही फौजदारी / आर्थिक गैरव्यवहाराची नोंद नसावी.
१०. संस्था कोणत्याही शासन विभागाकडून काळ्या यादीत समाविष्ट नसावी.

### ५. आवश्यक कागदपत्रे

१. संस्था नोंदणी प्रमाणपत्र.
२. NGO-DARPAN Unique ID प्रमाणपत्र.
३. PAN कार्ड व GST नोंदणी प्रमाणपत्र (लागू असल्यास).
४. मागील ३ वर्षांचे लेखापरीक्षित आर्थिक अहवाल.
५. मागील ३ वर्षांचे आयकर विवरणपत्र (ITR).
६. मागील ६ महिन्यांचे बँक स्टेटमेंट.

७. भिक्षावृत्ती गुंतलेल्या करिताचे निवासी आश्रम, किवा संस्थेस शासकीय अथवा स्वताःचे तत्सम अनाथ आश्रम,वृद्धाश्रम चालविण्याचा किमान ०२ वर्षा चा अनुभव असावा..

८. उपलब्ध निवारागृह व पायाभूत सुविधांची माहिती.

९. उपलब्ध मनुष्यबळाची यादी व अनुभव तपशील.

१०.संस्थेस प्राप्त पुरस्कार / गौरव / प्रशस्तीपत्रे.

११.रु. ५००/- स्टॅम्प पेपरवरील स्वयंघोषणा पत्र.

१२.न्यायालयीन / पोलीस प्रकरण नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र.

१३.संस्थेचा वार्षिक कृती आराखडा.

१४.पुनर्वसन मॉडेल / Case Study नमुना.

१५.इतर आवश्यक कागदपत्रे.

**६. निवड प्रक्रिया व गुणांकन पद्धती**

संस्थांची निवड तांत्रिक सादरीकरण, अनुभव, आर्थिक क्षमता, पायाभूत सुविधा व पुनर्वसन आराखड्याच्या आधारे गुणांकन पद्धतीने करण्यात येईल.

**अ) तांत्रिक पात्रता (६० गुण)**

NGO-DARPAN नोंदणी – ०५ गुण

संबंधित क्षेत्रातील अनुभव – १५ गुण

निवारागृह संचालन अनुभव – १० गुण

उपलब्ध मनुष्यबळ – १० गुण

पायाभूत सुविधा – १० गुण

सामाजिक कार्यातील प्रतिष्ठा / पुरस्कार – ०५ गुण

डिजिटल डेटा व्यवस्थापन क्षमता – ०५ गुण

**ब) प्रकल्प सादरीकरण (४० गुण)**

पुनर्वसन कृती आराखडा – २५ गुण

कौशल्य विकास व रोजगार योजना – ५ गुण

आरोग्य, समुपदेशन व संरक्षण व्यवस्था – ५ गुण

CSR / Stakeholder समन्वय योजना – ०५ गुण

महानगरपालिकेचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

**७. निधी वितरण पद्धती**

योजनेअंतर्गत शासन निर्देशानुसार निधी खालीलप्रमाणे वितरित करण्यात येईल :

- पहिला हप्ता (३०%) – सर्वेक्षण, नोंदणी व संघटन उपक्रम.
- दुसरा हप्ता (५०%) – निवारागृह संचालन, अन्न, आरोग्य व पुनर्वसन सेवा.
- तिसरा हप्ता (२०%) – पुनर्वसन, कौशल्य विकास, रोजगार व पाठपुरावा.

महानगरपालिकेच्या समाधानकारक तपासणीनंतरच पुढील हप्ता वितरित करण्यात येईल.

**८. मार्गदर्शक तत्वांनुसार घटकनिहाय खर्चाचा तपशिल**

| अ.क्र. | खर्चाबाबत चा तपशील | खर्चाचे नियम | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | सर्वेक्षण/ ओळखपत्र,वाहतूक भत्ता याकरिता एकत्रित खर्च<br>(सर्वेक्षण तपशील स्माईल पोर्टलवर अद्यावत करणे) | एक रक्कमी | १,००,०००/- |
| २ | बचाव वाहतूक सहाय्य | प्रती व्यक्ती | २००/- |
| ३ | लाभार्थी चे आधार कार्ड व इतर लाभ कार्ड तयार करणे करिता. | प्रती कार्ड | १५०/- |
| ४ | लाभार्थी करिता एक वेळचे कपडे व स्वच्छता किट संच-२ | प्रती व्यक्ती | १२००/- |
| ५ | लाभार्थी करिता सकाळी चहा-नाश्ता,दुपारचे जेवण,दुपारचा चहा,रात्री चे जेवण. | प्रती व्यक्ती | १५०/- |
| ६ | एक प्रकल्प व्यवस्थापक मानधन | मासिक | २०,०००/- |
| ७ | समुपदेशक | प्रती भेट प्रमाणे | १,०००/- |
| ८ | समन्वयक | मासिक | १५,०००/- |
| ९ | काळजी वाहक / आया | मासिक | १५,०००/- |
| १० | स्वयंपाकी एक मानधन | मासिक | ८.०००/- |
| ११ | सुरक्षा रक्षक (३ शिफ्ट मध्ये) x ८०००/- | मासिक | २४,०००/- |
| १२ | आकस्मिक/आपत्कालीन निधी मासिक | प्रती वर्षाकरिता | १,२०,०००/- |
| १३ | लाभार्थीसाठी कौशल्य प्रशिक्षण (प्रति व्यक्ती प्रमाणे) | प्रती व्यक्ती | ४००/- |
| १४ | IEC(प्रचार प्रसिद्धी) वार्षिक | प्रती वर्षाकरिता | २,००,०००/- |
| १५ | प्रशाकीय खर्च प्रति वर्ष | प्रती वर्षाकरिता | १,००,०००/- |

## ९.देखरेख व सामाजिक लेखापरीक्षण व मुल्यांकन.

- योजनेचे रिअल-टाईम मॉनिटरिंग शासनाच्या ऑनलाइन पोर्टलद्वारे करण्यात येईल.
- महानगरपालिका, जिल्हा प्रशासन व सामाजिक लेखापरीक्षण पथकाद्वारे नियमित पाहणी करण्यात येईल.
- लाभार्थ्यांच्या सेवा, पुनर्वसन व रोजगार स्थितीचे मूल्यांकन करण्यात येईल.
- संस्थेने सर्व नोंदी डिजिटल स्वरूपात जतन करणे बंधनकारक राहील.

संस्थेने मासिक, तिमाही, सहामाही व वार्षिक अहवाल सादर करणे आवश्यक राहील.

## १०. करार कालावधी

संस्थेची नियुक्ती प्रारंभी ३ वर्षाकरिता करण्यात येईल. समाधानकारक कामगिरी व शासन मान्यतेनुसार मुदतवाढ देता येईल.

## ११. अटी व शर्ती

- नियुक्त संस्था शासनाच्या सर्व नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.
- महाराष्ट्र Prevention of Begging Act १९६०, JJ Act २०१५, Mental Healthcare Act २०१७ व इतर लागू कायद्यांचे पालन करणे आवश्यक राहील.
- महानगरपालिकेला कोणतीही प्रस्ताव स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा पूर्ण अधिकार राहील.
- अपूर्ण / चुकीची माहिती असलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
- आवश्यकतेनुसार महानगरपालिका संस्थेची प्रत्यक्ष पाहणी करू शकते.
- संस्था लाभार्थ्यांच्या माहितीची गोपनीयता राखण्यास बांधील राहील.
- संस्थेने आवश्यकतेनुसार CSR, स्वयंसेवी संस्था व इतर Stakeholders यांचा समन्वय साधावा.
- लाभार्थ्यांच्या पुनर्वसनानंतर किमान १ वर्ष Follow-up करणे बंधनकारक राहील.
- संस्थेची कामगिरी असमाधानकारक आढळल्यास करार समाप्त करण्याचा अधिकार महानगरपालिकेकडे राहील.

सर्व सेवा सन्मानपूर्वक, मानवतावादी व संवेदनशील दृष्टिकोनातून पुरविणे आवश्यक राहील.

**१२.प्रस्ताव सादर करण्याची पद्धत**

तरी इच्छुक संस्थांनी आपला अर्ज व अभिस्वारस्य प्रस्ताव बंद पाकीट मध्ये दीनदयाळ अंत्योदय योजना -राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (DAY-NULM) विभाग, ६ वा मजला जळगाव शहर महानगरपालिका येथे दिनांक - /० /२०२६ ते दिनांक- /० /२०२६ या कालावधीत कार्यालयीन दिवशी कार्यालयीन वेळेत अभिस्वारस्य प्रस्ताव स्वीकारले जातील.

उपायुक्त तथा
शहर प्रकल्प अधिकारी
राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान
जळगांव मनपा,जळगांव

**जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव.**

## अभिरुची प्रस्ताव नमुना अर्ज

विषय : SMILE (Support for Marginalized Individuals for Livelihood and Enterprise) योजनेअंतर्गत "Comprehensive Rehabilitation of Persons Engaged in the Act of Begging" या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी अभिरुची प्रस्ताव (Expression of Interest) सादर करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून, आपल्या कार्यालयामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या अभिरुची प्रस्ताव सूचनेनुसार आमची संस्था सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी अभिरुची प्रस्ताव सादर करीत आहे.

आमच्या संस्थेची माहिती पुढीलप्रमाणे आहे –

१. संस्थेचे नाव :------------------------------------------------------------

२. संस्थेचा पूर्ण पत्ता :--------------------------------------------------------

३. संस्था नोंदणी क्रमांक व दिनांक :---------------------------------------------

४. संस्था नोंदणी अधिनियम :-------------------------------------------------

५. NGO-DARPAN Unique ID :----------------------------------------------

६. PAN क्रमांक :------------------------------------------------------------

७. GST क्रमांक (लागू असल्यास) :----------------------------------------------

८. संस्थेचे प्रमुख / अध्यक्ष यांचे नाव :---------------------------------------

९. संपर्क क्रमांक :---------------------------------------------------------

१०. ई-मेल:-------------------------------------------------------------

११. संबंधित क्षेत्रातील अनुभव : ---------------------------------------------

१२. निवारा गृहाची उपलब्ध क्षमता (खाटांची संख्या) :------------------------------

१३. उपलब्ध मनुष्यबळाचा तपशील : ------------------------------------------

१४. संस्थेची प्रमुख कार्यक्षेत्रे : ---------------------------------------------

आम्ही जाहीर करतो की, अभिरुची प्रस्तावामध्ये नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती आम्हाला मान्य असून, प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक पात्रता, अनुभव, मनुष्यबळ, पायाभूत सुविधा व आर्थिक क्षमता आमच्या संस्थेकडे उपलब्ध आहे.

सादर प्रस्तावासोबत निविदेनुसार आवश्यक सर्व कागदपत्रे जोडलेली आहेत. सादर केलेली माहिती खरी व अचूक असून, कोणतीही माहिती चुकीची आढळल्यास महानगरपालिकेचा निर्णय आम्हाला बंधनकारक राहील.त्यामुळे आमच्या संस्थेचा अभिरुची प्रस्ताव स्वीकारून तांत्रिक मूल्यांकनासाठी विचार करण्यात यावा, ही नम्र विनंती.

धन्यवाद.

स्थळ : ______________________________

दिनांक : ______________________________

संस्थेच्या वतीने,

स्वाक्षरी : ______________________________

नाव : ______________________________

पद : ______________________________

संस्थेचे नाव : ______________________________

संस्थेचा शिक्का

- आवश्यक कागदपत्र

  प्रस्तावासोबत खालील कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील :

१. संस्था नोंदणी प्रमाणपत्र.
२. NGO-DARPAN Unique ID प्रमाणपत्र.
३. PAN कार्ड व GST नोंदणी प्रमाणपत्र (लागू असल्यास).
४. मागील ३ वर्षाचे लेखापरीक्षित आर्थिक अहवाल.
५. मागील ३ वर्षांचे आयकर विवरणपत्र (ITR).
६. मागील ६ महिन्यांचे बँक स्टेटमेंट.
७. भिक्षावृत्ती गुंतलेल्या करिताचे निवासी आश्रम, किवा संस्थेस शासकीय अथवा स्वतः:चे तत्सम अनाथ आश्रम,वृद्धाश्रम चालविण्याचा किमान ०२ वर्षा चा अनुभव असावा.
८. उपलब्ध निवारागृह व पायाभूत सुविधांची माहिती.
९. उपलब्ध मनुष्यबळाची यादी व अनुभव तपशील.
१०. संस्थेस प्राप्त पुरस्कार / गौरव / प्रशस्तीपत्रे.
११. रु. ५००/- स्टॅम्प पेपरवरील स्वयंघोषणा पत्र.
१२. न्यायालयीन / पोलीस प्रकरण नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र.
१३. संस्थेचा वार्षिक कृती आराखडा.
१४. पुनर्वसन मॉडेल / Case Study नमुना.
१५. इतर आवश्यक कागदपत्रे.

**मार्गदर्शक तत्वांनुसार घटकनिहाय खर्चाचा तपशिल**

| अं.क्र. | खर्चाबाबत चा तपशील | खर्चाचे नियम | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | सर्वेक्षण/ ओळखपत्र,वाहतूक भत्ता याकरिता एकत्रित खर्च (सर्वेक्षण तपशील स्माईल पोर्टलवर अद्यावत करणे) | प्रती व्यक्ती | |
| २ | बचाव वाहतूक सहाय्य | प्रती व्यक्ती | |
| ३ | लाभार्थी चे आधार कार्ड व इतर लाभ कार्ड तयार करणे करिता. | प्रती कार्ड | |
| ४ | लाभार्थी करिता एक वेळचे कपडे व स्वच्छता किट संच-२ | प्रती व्यक्ती | |
| ५ | लाभार्थी करिता सकाळी चहा-नाश्ता,दुपारचे जेवण,दुपारचा चहा,रात्री चे जेवण. | प्रती व्यक्ती | |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | एक प्रकल्प व्यवस्थापक मानधन | मासिक | |
| ७ | समुपदेशक | प्रती भेट प्रमाणे | |
| ८ | समन्वयक | मासिक | |
| ९ | काळजी वाहक / आया | मासिक | |
| १० | स्वयंपाकी एक मानधन | मासिक | |
| ११ | सुरक्षा रक्षक (३ शिफ्ट मध्ये त्याचे एकत्रित मानधन) | मासिक | |
| १२ | आकस्मिक/आपत्कालीन निधी मासिक | प्रती वर्षाकरिता | |
| १३ | लाभार्थीसाठी कौशल्य प्रशिक्षण (प्रति व्यक्ती प्रमाणे) | प्रती व्यक्ती | |
| १४ | IEC(प्रचार प्रसिद्धी) वार्षिक | प्रती वर्षाकरिता | |
| १५ | प्रशासकीय खर्च प्रति वर्ष | प्रती वर्षाकरिता | |

**धनश्री शिंदे**
**उपायुक्त (महसुल)**
**जळगाव शहर महानगरपालिका,जळगाव.**

**जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव.**

**अभिरुची प्रस्ताव स्वयंघोषणा पत्र**

---

अभिरुची प्रस्तावाला अनुसरुन करावयाचे प्रतिज्ञापत्र(मसूदा)

संदर्भः ------------------------------------------------------ दि. / /२०२--

मी---------------------------------वय-----------------राहणार-------------------

सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की.

१. मी आम्ही संस्थेने दिवाळखोरी जाहीर केलेली नाही अथवा दिवाळखोर म्हणून घोषीत झालेली नाही.

२. मी/आम्ही / संस्थेने अनुचीत कामगार प्रथेचा अवलंब केलेला नाही.

३. मी/आम्ही संस्थेने कोणतेही गैरकृत्य करुन नैतीक अधःपतनाने कोणतेही कृत्य आमचेकडून घडलेले नाही.

४. माझेकडून / आमचेकडून संस्थेकडून कोणतेही गुन्हेगारी कृत्य घडलेले नाही. तसेच उक्त कृत्यांसाठी मी आमच्या संस्थे विरुध्द कोणत्याही न्यायालयात दावा दाखल झालेला नाही.

५. मी/आम्ही/संस्थे विरोधात आयकर /विक्रीकर व फेरा इ.कायद्याचे उल्लंघन केलेले नाही.त्याबाबत माझ्या/आमच्या/संस्थेच्या विरुद्ध खटला किंवा दावा दाखल झालेला नाही.

६. मला/आम्हाला/संस्थेला शासकीय/स्थानिक संस्था किवा न.पा./म.न.पा. कार्यालयाने काळ्या यादीत टाकलेले नाही.

७. मला/आम्हाला कामाचे स्वरूप व व्याप्ती मध्ये दिल्याप्रमाणे तसेच करारनामा अटीशर्ती प्रमाणे कामाचा / मालपुरवठाचा दर्जा चांगला नसल्यास अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव मक्ता रद्द केल्यास मी/आम्ही सदर ठिकाणी दुरुस्तीसाठी व इतर कामासाठी केलेल्या खर्चाची मागणी करणार नाही.

८. मी/आम्ही असे घोषित करतो की,आमचे संस्थेचे /फर्म चे भागीदारी म्हणून म.नं.पा.चे नगरसेवक / अधिकारी /कर्मचारी इत्यादी समाविष्ट नाहीत.

९. पात्रते बाबतचे दाखल केलेले कागद पत्र सर्व खरे आहेत.

१०. मी सादर केलेले कागदपत्रामध्ये खोटी/फेरफार केलेले कागदपत्रे आढळून आल्यास मी कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील.

११. शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार प्रस्ताव मान्य /अमान्य अथवा बदल करण्याचा संपूर्ण अधिकार मा.आयुक्त सो.ज.श.मनपा यांना राहील व ते मला/आमच्या संस्थेस मान्य राहील.

१२.

निविदाकाराची स्वाक्षरी :---------------------------------

निवडा धारकाचे संपूर्ण नाव :---------------------------------

निविदा धारकाचा संपूर्ण पता :---------------------------------

फोन नंबर :---------------------------------

मोबाईल नंबर :---------------------------------

ईमेल आय.डी. :---------------------------------

सोबत आवश्यक कागद पत्रे.

१. पात्रता व आवश्यक कागद पत्रे.
२. Financial Bid Covering Letter (दर प्रस्ताव सादर करण्याबाबत)
३. स्वयंघोषणापत्र
४. ₹५०० स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र
५. Technical Proposal Cover Letter
६. ज्या संस्थेचे अभिरुची प्रस्ताव मूल्यांकनाअंती पात्र ठरतील अशा संस्थेला निवड समिती समोर ppt सादरीकरण करून काम देणे बाबत निर्णय घेण्यात येईल.